# पुणे महानगरपालिका
## शिवाजीनगर, पुणे ४११००५,
## महाराष्ट्र
## जाहीर सूचना
## (प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापनाबाबत)

शहरातील जनतेला कळविण्यात येते की, केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामानबदल मंत्रालयाने अधिसूचना क्र. जीएसआर - ३२० (इ) दिनांक १८/०३/२०१६ अन्वये प्लॅस्टिक वेस्ट मॅनेजमेंट रुल्स - २०१६ लागू केलेले आहेत. तसेच महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने अधिसूचना क्रमांक प्लॅस्टिक - २०१८ / प्र. क्र. २४/तां. क्र. ४ ११२०१७ दिनांक एप्रिल २३, मार्च २०१८ व दिनांक ०२ जुलै, २०१८ नुसार अविघटनशील कचऱ्यामुळे स्वच्छ भारत अभियानाच्या अंमलबजावणीवर अनिष्ट परिणाम होत असल्याने "महाराष्ट्र प्लॅस्टिक व थर्मोकॉल अविघटनशील वस्तूंचे (उत्पादन, वापर विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक व तदनंतर वेळोवेळी केलेल्या सुधारणा) अधिसूचना, २०१८ संपूर्ण राज्यासाठी लागू करण्यात आली आहे." या अधिसूचनेची अंमलबजावणी न करणाऱ्यास प्रथम वेळी रक्कम रु. ५०००/-, दुसऱ्या वेळी रक्कम रु. १०,०००/- व तिसऱ्या वेळी रक्कम रु. २५,०००/- व तीन महिन्यांची कैद अशी दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, उपरोक्त नियम व अधिसूचनेची कठोर अंमलबजावणी पुणे शहरामध्ये चालू आहे. यातील तरतुदींचे उल्लंघन झाल्यास नियमाप्रमाणे उचित कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

जावक क्र. :
दिनांक :
ठिकाण :

पुढारी २०१६।१९

सही/-
(सौरभ राव)
आयुक्त
पुणे महानगरपालिका

(शिक्का)

जाहिरात क्र. १/१४७
दि. १९/६/२०१९

**काळाची गरज पाणी काटकसरीने वापरा.**